## थोडक्यात

### माजी विद्यार्थी व्याख्यानमालेत आधाराश्रमाविषयी मार्गदर्शन

**नाशिक :** नाशिक एज्युकेशन सोसायटी आणि पेठे विद्यालयाच्या शताब्दी महोत्सव वर्षाच्या निमित्ताने माजी विद्यार्थी व्याख्यानमाला उपक्रमांतर्गत पेठे विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि आधाराश्रम नाशिकचे विश्वस्त प्रा. प्रभाकर केळकर यांनी महिला आश्रम ते आधाराश्रम या प्रवासाची माहिती दिली. आधार आश्रमाचे कार्य, त्याचबरोबर दत्तक विधान प्रक्रिया याबद्दल मार्गदर्शन केले. मूल दत्तक घेताना आधार आश्रमाकडून दिली जाणारी सेवा, तसेच मूल दत्तक घेण्याकरिता आवश्यक असणारी प्रक्रिया समजावून सांगितली. आधार आश्रमामध्ये येणारी बालके कोणत्या परिस्थितीत आधार आश्रमात दाखल होतात, याच्या आठवणी आणि प्रसंग वर्णन केले. त्यांनी सांगितलेले अनुभव श्रोत्यांना अंतर्मुख करणारे होते. याप्रसंगी त्यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. या आभासी व्याख्यानाप्रसंगी संस्था अध्यक्ष प्रा. सूर्यकांत रहाळकर, उपाध्यक्ष प्रा. दिलीप फडके, चंद्रशेखर मोंढे, कार्यवाह राजेंद्र निकम यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर वाड, मुख्याध्यापक कैलास पाटील, अर्थ सहकार्यवाह शैलेश पाटोळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन रुपाली ठाकूर यांनी केले. आभार उपमुख्याध्यापिका नंदिनी कहांडळ यांनी मानले.

### नेहरूनगर कामगार कल्याण केंद्रातर्फे कविसंमेलन

**नाशिक :** शहरातील नेहरूनगर येथील कामगार कल्याण केंद्राच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधवरवड्यानिमित्त सेवानिवृत्त न्यायमूर्ती वसंतराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन घेण्यात आले. यावेळी न्या. पाटील यांनी मराठी भाषेचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसार होण्यासाठी तनमनाने मराठी भाषेचे संवर्धन होणे तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. संमेलनात न्या. पाटील, गुणवंत कामगार विलास गोडसे, अशोक भालेराव, रवींद्र मलुंजकर, प्रा. डॉ. कृष्णा शहाणे, अनिल मनोहर, चंद्रकांत ढासे, गणेश पवार, विशाल टर्ले, माणिकराव गोडसे, राजेंद्र वाघ, रामचंद्र शिंदे, अलका कोठावदे, मिलिंद दाणी, अनिल पगारे आदींनी आपल्या काव्य रचना सादर केल्या. सूत्रसंचालन रवींद्र मालुंजकर यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निर्भीडपणे मतदान करण्याची शपथ घेण्यात आली. आभार नेहरूनगर केंद्राचे संचालक संदीप चव्हाण यांनी केले.

### 'गांधी हत्येवरील चित्रपटावर बंदी आणावी'

**नाशिक :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येवर आधारित 'व्हाय आय किल्ड गांधी' हा चित्रपट महाराष्ट्रातील चित्रपट गृहांमध्ये तसेच ओटीटीवर प्रदर्शित करण्यास बंदी करावी, अशी मागणी शहर काँग्रेस सेवादलाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात भूमिका मांडण्यात आली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येवर आधारित 'व्हाय आय किल्ड गांधी' हा चित्रपट ३० जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून कडव्या विचारांचे चित्रपट निर्माता गांधी हत्येचे समर्थन करू पाहत आहेत. एकीकडे महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचा दिवस अहिंसा आणि शांतता म्हणून पाळला जात असताना दुसरीकडे अशांतता, द्वेष आणि अहिंसेचे समर्थन करणारा चित्रपट प्रदर्शित होणार आहे, कोणत्याही हिंसक आणि अमानवीय कृत्याचे उदात्तीकरण भारतीय संस्कृतीच्या विरोधात आहे, असे शहराध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर यांनी नमूद केले आहे.

# स्वामित्व योजनेअंतर्गत मिळकत पत्रिकांचे वाटप

## सिन्नर तालुक्यातील १८ गावांची सनद तयार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** स्वामित्व योजनेंतर्गत सिन्नर तालुक्यातील १८ गावांची सनद तयार करण्यात आली असून प्रजासत्ताकदिनी सिन्नर येथे आयोजित कार्यक्रमात आ. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते सनदचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदार राहुल कोताडे, भूमी अभिलेख सिन्नरचे उपअधीक्षक भगवान शिंदे उपस्थित होते.

सिन्नर तालुक्यात ड्रोनच्या माध्यमातून स्वामित्व योजनेंतर्गत मोजणी काम पूर्ण झाल्यानंतर तयार झालेल्या सनदचे आ. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. समवेत तहसीलदार राहुल कोताडे, भूमी अभिलेखचे उपअधीक्षक भगवान शिंदे आदी. (छाया- दत्ता जोशी)

महसूल विभागात सर्वप्रथम नाशिक जिल्ह्यात 'सर्व्हे ऑफ इंडिया'च्या वतीने ड्रोन उपलब्ध करून देण्यात आले. जिल्ह्यातील १५ तालुक्यांतील एकूण १४२८ गावठाण स्वामित्व योजनेत पात्र आहेत. सिन्नर तालुक्यातील एकूण ८० गावांचे ड्रोनच्या माध्यमातून मोजणी काम पूर्ण झाले. त्यापैकी आजपर्यंत सर्व्हे ऑफ इंडियाकडून ६४ नकाशे प्राप्त झाले असून त्यापैकी ४७ गावांचे चौकशी काम पूर्ण झाले आहे.

चौकशी पूर्ण गावांपैकी ३४ गावांच्या मिळकत पत्रिका तयार झाल्या असून उर्वरित गावांच्या मिळकत पत्रिका लवकरच तयार होणार आहेत. सनद वाटप कार्यक्रमात स्वामित्व योजनेचे उद्दिष्ट आणि फायदे याविषयी भूमी अभिलेखचे उपअधीक्षक शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

राज्यातील साधारणतः ४०,००० गावांतील गावठाणाचे नगर भूमापन अद्याप झालेले नाही. ब्रिटिश राजवटीतदेखील सादर गावठाणांचे मोजणी काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे गावातील नागरिकांना अनेक अडचणी भासत आहेत. जसे की, घरांचा किंवा मिळकतींचा नकाशा तयार नसल्यामुळे दोन मिळकतींच्या सीमा निश्चित नाहीत.

वैयक्तिक कारणासाठी अथवा घरबांधणीसाठी मिळकत तारण ठेवून कर्ज घेता येत नाही. गावठाणातील जमिनी खरेदी-विक्री करताना अडचणी निर्माण होतात. मालमत्तेचे मालकीपत्र आणि अभिलेख नसल्यामुळे गावाची आर्थिक पत निर्माण होण्यास अडचणी येतात. ग्रामस्थांची ही गैरसोय टाळण्यासाठी शासनाने स्वामित्व योजना मांडली. या योजनेनुसार शासनाच्या मालकीच्या मिळकतींचे संरक्षण होईल. मिळकतींचा नकाशा आणि सीमा निश्चित होतील. मिळकतीचे नेमके क्षेत्र माहीत होईल. मालकी हक्काची अभिलेख मिळकत पत्रिका तयार होईल. ग्रामस्थांच्या नागरी हक्कांचे संवर्धन होईल. गावातील रस्ते शासनाच्या ग्रामपंचायतींच्या खुल्या जागा, नाले यांच्या सीमा निश्चित होऊन अतिक्रमण रोखता येईल. मिळकत पत्रिका तयार झाल्यामुळे घरावर कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध होईल.

मिळकतींना बाजारपेठेमध्ये तरलता येऊन गावाची आर्थिक पत उंचावेल. ग्रामपंचायतीला गावातील कर आकारणी, बांधकाम परवानगी, अतिक्रमण निर्मूलन यासाठी अभिलेख आणि नकाशा उपलब्ध होईल. सदरची योजना नाशिक जिल्ह्यात राबविताना नाशिक विभागाचे भूमी अभिलेखचे उपसंचालक अजय कुलकर्णी, जिल्हा अधीक्षक महेश शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

त्र्यंबकेश्वरजवळील वाढोली येथील प्रतिकेदारनाथ मंदिर करोना प्रादुर्भावामुळे बंद ठेवण्यात आले असले तरी मंदिर परिसरात भाविकांची दररोज अशी गर्दी होत असते. (छाया-यतीश भानू)

# जन्मापासूनच मुलींचा विषमतेशी संघर्ष

## बालिका दिन कार्यक्रमात डॉ. तृप्ती उकास यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

नाशिक : अजूनही भारतीय मुलींना शिक्षण अर्धवट सोडावे लागत आहे. घरातील काम, आर्थिक स्थिती, घरातील जबाबदारी यामुळे त्यांना शिक्षण पूर्ण करता येत नाही. शिक्षित व्यक्तीला कोणीही फसवू शकत नाही, म्हणून मुली, स्त्रिया यांचे शोषण थांबविण्यासाठी त्यांना शिकविले पाहिजे. मुलींना जन्मापासूनच विषमतेला तोंड द्यावे लागते. समाजाच्या मनात तिच्याविषयी असलेली दुय्यमपणाची भावना बदलली पाहिजे, असे प्रतिपादन जबलपूर येथील हिंदी कवयित्री प्रा. डॉ. तृप्ती उकास यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पिंपळगाव बसवंत येथील कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त आभासी माध्यमातून आयोजित चर्चासत्रात प्रा. उकास यांनी मार्गदर्शन केले. मुलींच्या अंगी विविध क्षमता असतात. संधी मिळताच त्यांनी विविध क्षेत्रांत स्वतःला सिद्ध केले आहे. म्हणून समाजात अर्धा हिस्सा असणाऱ्या महिला शक्तीला बळकट करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय बालिका दिनाचा उद्देश कन्या, बालभ्रूण हत्या थांबविणे, मुलींच्या समस्या जाणून घेणे, लिंगसमानता दृष्टिकोन समाजात रुजविणे. मुलींचे हक्क मान्य करणे हा आहे, डिजिटल युगात सायबर गुन्ह्यास मुली, स्त्रिया बळी पडत आहेत. त्यांना सायबर सुरक्षिततेविषयी जागृत केले पाहिजे. मुली स्व अधिकाराबाबत जागृत असल्या पाहिजे. समाजाने नेतृत्वाचे गुण असलेल्या मुलींना प्रेरणा द्यावी, असे आवाहन डॉ. उकास यांनी केले.

या वेळी प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे, उपप्राचार्य प्रा. ज्ञानोबा ढगे, उपप्राचार्य डॉ. सुनील अहिरे, प्रा .भगवान कडलग, प्रा. डॉ. शोभा डहाळे, प्रा. शांताराम वळवी आदी उपस्थित होते. या वेळी प्राचार्य डॉ. शिंदे यांनी बालिका दिनानिमित्त विविध उपक्रम आयोजित केल्यामुळे मुलींसमोर येणाऱ्या अडचणींची चर्चा होऊन तिच्या प्रगतीचा आलेख मांडता येतो, असे सांगितले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. शोभा डहाळे यांनी केले. आभार प्रा. डॉ. सोनाली पाटील यांनी मानले.

# शहरात १०६ ठिकाणी इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग केंद्रे

## प्रजासत्ताक दिन सोहळ्यात पालकमंत्र्यांची माहिती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** प्रदुषणमुक्त शहरासाठी इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला चालना देण्याची मोहीम महानगरपालिकेने हाती घेतली असून इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी १०६ ठिकाणी सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. लवकरच बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर त्याची सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

शहरातील पोलीस कवायत मैदानात आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजवंदन समारंभात भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक डॉ. बी. जी. शेखर, पोलीस आयुक्त दीपक पाण्डेय, जिल्हाधिकारी सूरज मांढरे, महानगरपालिकेचे आयुक्त कैलास जाधव, पोलीस अधीक्षक सचिन पाटील आदी उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील पोलीस कवायत मैदानात आयोजित मुख्य कार्यक्रमप्रसंगी पालकमंत्री छगन भुजबळ यांनी विविध मान्यवरांची भेट घेत विचारपूस केली.

दोन वर्षांपासून करोनाचे सावट कायम असले तरी जनतेच्या सहकार्याने करोनावर आपण मात करू शकतो. त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या विकासाला अधिक गतिमान करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे भुजबळ यांनी नमूद केले. गरजूंना स्वस्त दरात दोन वेळचे अन्न उपलब्ध व्हावे यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या शिवभोजन थाळी योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात ९० शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत. ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत जिल्ह्यातील ४९ लाख ५७ हजार ४३५ लाभार्थ्यांना शिवभोजन थाळीचा लाभ उपलब्ध करून देण्यात आल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

करोनामुळे निधन झालेल्या व्यक्तींच्या वारसांना ३६ कोटी ४२ लाखांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले असून करोना काळात शून्य ते १८ वयोगटातील दोन्ही पालक गमावलेल्या २३ बालकांना प्रत्येकी पाच लाख सानुग्रह अनुदान मुदत ठेवीच्या स्वरूपात देण्यात आले आहे. तसेच या बालकांना बाल संगोपन योजनेंतर्गत प्रति महिना ११०० रुपये एवढा लाभ देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आत्तापर्यंत तीन लाख १३ हजार ५९ रूपये शुल्क संबंधित शाळांना देण्यात आले आहे.

विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे यांच्या संकल्पनेतून राबविलेल्या उभारी उपक्रमासाठी तसेच आभासी ७/१२ आणि बिनशेती चलन वितरण कार्यप्रणालीचे कौतुक करण्यात आले. सेवा हमी कायद्यात सर्वाधिक १०१ सेवांचा समावेश करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांच्या या योजनेचा विस्तार राज्यात करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यंत्रणांच्या समन्वयाने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी टास्क फोर्स गठित करण्यात आल्याने योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या जात आहेत. तसेच बँकांमार्फत मोठ्या प्रमाणावर कर्ज वाटप झाल्याने त्यांच्या समस्या कमी होऊन मागील वर्षांच्या तुलनेत शेतकरी आत्महत्यांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे त्यांनी सांगितले.

नमामि गोदा मोहिमेच्या माध्यमातून गोदावरी नदीच्या शुद्धीकरणाच्या मोहिमेसोबत साबरमती प्रकल्पाच्या धरतीवर नदीकाठांचे आणि घाटांचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. आगामी काळात बिटको रुग्णालयात पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालय सुरू करून शहराची वैद्यकिय यंत्रणा बळकट करण्याचा मानसही भुजबळ यांनी व्यक्त केला. ध्वजवंदनानंतर त्यांनी शहीद झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनतर जिल्हा ग्रामीण पोली यंत्रणेला नव्याने देण्यात आलेल्या चार वाहनांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

# सटाणा प्रशासकांच्या दालनातील बैठक वादात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** सटाणा नगर परिषद प्रशासकांच्या दालनात माजी आमदार संजय चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेली अधिकाऱ्यांची आढावा बैठक वादात सापडली आहे. याप्रकरणी एकीकडे प्रांताधिकारी आणि मुख्याधिकाऱ्यांनी कानावर हात ठेवले असताना भाजप, राष्ट्रवादी तसेच सटाणा शहर विकास आघाडी आदी सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी पालिका मुख्याधिकारी नितीन बागूल यांच्याकडे केली आहे.

नगर परिषदेवर शासनाने प्रशासकाची नेमणूक केलेली असताना प्रशासकांच्या दालनात राष्ट्रवादीचे माजी आमदार चव्हाण यांनी आपल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेतल्याचे समजते. ही बैठक म्हणजे प्रशासकीय अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव टाकण्याचा प्रकार असून बैठकीला परवानगी कोणी दिली, असा प्रश्न सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे. प्रशासक तथा बागलाणचे प्रांताधिकारी बबन काकडे यांनी यासंदर्भात कोणत्याही आढावा बैठकीला परवानगी दिली नसल्याचे नमूद केले.

महिंद्रा रूरल हाऊसिंग फायनान्स लि.

शुद्धीपत्रक

मागणी सूचना दिनांक ०२.११.२०२१ रोजी प्रकाशित केली त्यात मागणी दिनांक २३.०९.२०२१ ऐवजी २२.०९.२०२१ असे वाचावे त्या साठी हे शुद्धीपत्रक

अधिकृत अधिकारी
महिंद्रा रूरल हाऊसिंग फायनान्स लि.

मत्तेची ऑनलाइन ई-लिलाव विक्री

कोटक महिन्द्र बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र.
शाखा कार्यालय : पहिला मजला, पायस, बीवायके कॉलेजच्या समोर, थत्ते नगर रोड, नाशिक-४२२ ००५.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

**सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(६) यासह वाचलेल्या नियम ८(५) अंतर्गत वित्तीय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ गहाणवट असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा ''बीएचएफएल''द्वारा तिच्या नावे असलेल्या ऋणांच्या अभिहस्तांकनाच्या अनुसार १२.११.२०२१ रोजी कोटक महिन्द्र बँक लि.च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा सिटी फायनान्शियल कन्झ्युमर फायनान्स इंडिया लिमिटेड (यापुढे 'सीसीएफआयएल' म्हणून संबोधित) यांच्या नावे असलेल्या ऋणांच्या अभिहस्तांकनाच्या अनुसार घेण्यात आला आहे. सदर मालमत्तेची विक्री **श्रीमती कमलावती सबल सिंह राजपूत व श्री. सबल सिंह राजाराम राजपूत** यांच्याकडील दी कोटक महिन्द्र बँक लि., सुरक्षित धनकोची देणी असलेले, **कर्ज खाते क्र. १३०७१५०५ अंतर्गत** वसुलीपर्यंत पुढील लागू व्याजासह २५.०१.२०२२ रोजीप्रमाणे रु. ९,१४,५६०/- या रकमेच्या वसुलीकरिता **५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह ०८.०३.२०२२ रोजी दु. १२.०० व दु. ०१.०० दरम्यान** ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे. राखीव किंमत रु.११,००,०००/- (रुपये अकरा लाख फक्त) असेल आणि इसारा रक्कम ठेव रु.१,१०,०००/- (रुपये एक लाख दहा हजार फक्त) असेल व इरठे व केवायसीच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख **०७.०३.२०२२** रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : धारण केलेला सर्व्हे नं. २७७ए/१/२, फ्लॅट नं. ०६, 'जीवन राही को-ऑप. हाऊ. सोसायटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिल्डिंग/ स्ट्रक्चरमधील, व्हिलेज देवलाली शिवार व नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत.

सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम १३च्या पोट-कलम ८च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. आम जनतेस आणि विशेषकरून ऋणकोंनी कृपया नोंद घ्यावी की, जे काही असेल त्या कारणास्तव निर्धारित केलेला लिलाव अयशस्वी ठरल्यास सुरक्षित धनको खासगीरीत्या विक्रीद्वारा सुरक्षित हिताची अंमलबजावणी करतील. कोणतेही स्पष्टीकरण/ मत्तेसंबंधित आवश्यक माहिती याकरिता संपर्क साधू शकतील: **श्री. राजेंद्र दहिया (+९१ ८४४८२६४५१५), श्री. गुरपाल सिंह (+९१ ९५९२९२१११४), श्री. ज्ञानेश जाडे (+९१ ९४२०१०१२८०).**

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **HTTPS://WWW.KOTAK.COM/EN/BANK-AUCTIONS.HTML** या लिंकला भेट द्यावी.

कोटक महिन्द्र वेबसाइट म्हणजेच WWW.KOTAK.COM आणि/किंवा **HTTPS://BANKAUCTIONS.IN/** यावर तरतूद करण्यात आली आहे.

**स्थळ : नाशिक**
**तारीख : २८.०१.२०२२**

**प्राधिकृत अधिकारी**
**कोटक महिन्द्र बँक लिमिटेड**

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११० ००१. फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

**डेहराडून शाखा कार्यालय :** पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, शॉप नं. ३०१ व ३०२, लक्ष्मी चेम्बर्स ६९, राजपूर रोड, डेहराडून रोड-२४८ ००१.

**तारखेनुसार सुधारित सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ३(१) यासह वाचलेल्या वित्तीय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचनेच्या चॅप्टर IIIच्या कलम १३(२) आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणी अंतर्गत सूचना**

आम्ही, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (यापुढे **'पीएनबीएचएफएल'** म्हणून संदर्भित) वित्तीय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचनेच्या चॅप्टर ३च्या कलम १३(२) आणि सुरक्षा हित कायदा २००२च्या अंमलबजावणी अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली होती. उक्त मागणी सूचना हप्ता/ व्याजाचे प्रदान न केल्यामुळे भारतीय रिझर्व्ह बँक/ नॅशनल हाऊसिंग बँक मार्गदर्शक सूत्रांनुसार तुमच्या खात्याचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकरण केल्यामुळे तुम्हा याखाली नमूद केलेले सर्व ऋणको/ सह-ऋणको/ हमीदारांकरिता आमच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा निर्गमित करण्यात आली होती. त्यातील समाविष्ट मजकुरात मुद्दल रकमेचा हप्ता, व्याज इ.चा प्रदानामधे तुमच्याद्वारा झालेली कसूर दाखविण्यात आली आहे.

याअधिक, काही कारणास्तव, आम्हास विश्वास वाटतो की, तुम्ही मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात आणि म्हणून या मागणी सूचनेची प्रसिद्धी जी उक्त कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गतसुद्धा आहे. तुम्हास याद्वारा या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीच्या आत 'पीएनबीएचएफएल'ला आतापर्यंतचे व्याज व आकारासह पूर्वोक्त रकमेचे प्रदान करण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास 'पीएनबीएचएफएल' ऋणको व हमीदारांच्या सुरक्षित मत्तेचा ताबा घेऊन एक किंवा अनेक सुरक्षित मत्तेच्या अनुसार, उक्त कायद्याच्या कलम १३(४)च्या कोणत्याही किंवा सर्व तरतुदींतर्गत आवश्यक कारवाई/ उपाययोजना सुरू करील. सुरक्षा हित कायदा, २००२ची अंमलबजावणी आणि वित्तीय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचनेच्या कलम १३च्या पोटकलम (८)च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधीत आहोत, जेथे त्या अंतर्गत तुम्ही जाहीर किंवा खासगी कराराद्वारा निविदा मागवून, दरपत्रके मागवून, जाहीर लिलावाद्वारा सुरक्षित मत्तेच्या विक्रीकरिता सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपर्यंत केवळ 'पीएनबीएचएफएल'द्वारा निघालेली सर्व किंमत, आकार व खर्चासह एकत्रित अदत्त देणींची संपूर्ण रक्कम भरू शकता/ प्रदान करू शकता.

याअधिक तुम्हास पूर्वोक्त सुरक्षित मत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरणापासून उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अंतर्गत प्रतिबंध करण्यात आले आहे.

| अ. क्र. | लोन अकाऊन्ट नं. | ऋणको व सह-ऋणकोचे नाव/ पत्ता | हमीदाराचे नाव व पत्ता | गहाणवट मालमत्ता | मागणी सूचनेची तारीख | मागणी सूचनेच्या तारखेनुसार अदत्त देणी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **एचओयू/डीईएच/ १०१८/५८८५१० ब्रँच ऑ. डेहराडून** | **रमेशचंद्र चंडोला व सुनीता चंडोला :** पत्ता : ट्रान्झिट फॅसिलिटी, डीआरडीओ, पिन- ९१४६९१, सी/ओ ५६ एपीओ, नाशिक- ४२२१०१, महाराष्ट्र, भारत. | **लागू नाही** | खासरा नं. १७०७/२, मौझा आर्केडिया, ग्रॅन्ट परगणा पाचवादून, डेहराडून, उत्तराखंड- २४८ ००१, भारत. | 08.10.2021 | **रु. ३२०६०२०.४०/-** (रुपये बत्तीस लाख सहा हजार वीस व पैसे चाळीस फक्त) |

**स्थळ : डेहराडून, दिनांक : २८.०१.२०२२**

**स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी (मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)**

INDOSTAR HOME FINANCE PRIVATE LIMITED
Registered Office : One World Center, Tower 2A, 20th Floor, Jupiter Mills Compound, S B Marg, Mumbai - 400013, India

ताबा सूचना

**सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८(१)**

ज्याअर्थी, याखाली नमूद केलेल्या सुरक्षित धनकोंच्या प्राधिकृत अधिकारींनी, वित्तीय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित (कायदा २००२) ची अंमलबजावणी आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या (नियम ३) यासह वाचलेल्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणकोंवर फर्माविणारी दिनांकित २५/११/२०२१ मागणी सूचना निर्गमित केली आहे.

ऋणको रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको आणि आम जनतेस सूचना देण्यात येते की इन्डोस्टार होम फायनान्स प्रा. लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींनी प्रत्येक मालमत्तेच्या अनुसार नमूद केलेल्या तारखेदिवशी सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ८ यासह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३च्या पोट-कलम (४) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखालील वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केलेली रक्कम व त्यावरील व्याजाकरिता इन्डोस्टार होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या आकाराच्या विषयाधीन असेल.

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएल०एचएल-०११८००००२५३<br>एलएनकेएएल०एचएल-०११८००००२८६ | १. संदीप सावेलेराम शिंगोटे<br>२. निकिता संदीप शिंगोटे | रु. ११८१९६३/- (रुपये अकरा लाख एक्याऐंशी हजार नऊशे त्रेसष्ट फक्त) तारीख : २५.११.२०२१ | २४.०१.२०२२ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट नं. १०२, पहिला मजला, सी-विंग, साई सृष्टी, सर्व्हे नं.५६, हिस्सा नं. १झेड, तेजस्वीनी हॉटेल, व्हिलेज दोणे, ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१५०३, चार सीमा: उत्तर : ओपन प्लॉट , दक्षिण : फ्लोअर लॉबी, पूर्व : फ्लोअर लॉबी, पश्चिम : नं. १०१ व स्टेअरकेस

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएल०एचएल-०२१९००००९१८४ | १. विनोद सखाराम लोटे<br>२. आशा सखाराम लोटे | रु. १५०५३१४/- (रुपये पंधरा लाख पाच हजार तीनशे चौदा फक्त) तारीख : २५.११.२०२१ | २४.०१.२०२२ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट नं.७०१ ची सर्व प्रीमायसेस, मोजमापाचा एरिआ २८.२५५ चौ.मी. (कार्पेट), ७व्या मजल्यावरील, ''त्रिशूल गोल्डन व्हिल्ले'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील ''बी'' विंग मधील, मालमत्ता धारण केलेला सर्व्हे नं. ८७/२/बी/१,८७/२डी, ८७/२स४/२ बांधकाम केलेला, व्हिलेज सोनिवाली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे पडून असलेला व स्थित असलेला. चार सीमा: उत्तर : लॉबी एरिआ/फ्लॅट नं. ७०५, दक्षिण : ओपन प्लॉट, पूर्व : फ्लॅट नं. ७०२, पश्चिम : लिफ्ट एरिआ.

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएल०एचएल-००१८००००६४४२,<br>एलएनकेएएल०एचएल-००१८००००६४४३ | १. प्रशांत विलास बाबर<br>२. धनश्री प्रशांत बाबर | रु. २१०३०८९/- (रुपये एकवीस लाख तीन हजार एकोणनव्वद फक्त) तारीख : २५.११.२०२१ | २४.०१.२०२२ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट नं.३०६, तिसरा मजला, अक्षत अपार्टमेंट, शेलार व्हिलेज, वाडा रोड, भिवंडी, ठाणे-४२१३०२. चार सीमा : उत्तर: फ्लॅट नं. ३०७, दक्षिण : इंटरनल रोड, पूर्व : फ्लॅट नं. ३०५/स्टेअरकेस एरिआ, पश्चिम : वाडा रोड.

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएल०एचएल-०११९००००८७९३,<br>एलएनकेएएल०एचएल-०११९००००८७९४ | १. मोल्वी अर्शद मोह. ईस्माइल<br>२. गझाला अर्शद मोलवी | रु. २२५३७०१/- (रुपये बावीस लाख त्रेपन्न हजार सातशे एक फक्त) (तारीख : २५.११.२०२१) | २४.०१.२०२२ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट नं.१०३, साई इच्छापूर्ती कॉम्प्लेक्स, व्हिलेज चिंचकर कुडूस, ''ए''विंग, ठाणे- ४०१४०४, महाराष्ट्र, भारत. चार सीमा : उत्तर : चिंचघर रोड, दक्षिण : स्टेअरकेस, पूर्व : फ्लॅट नं. १०४, पश्चिम : फ्लॅट नं. १०२.

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएल०एचएल-०९१८००००५२५६<br>एलएनकेएएल०एचएल-०९१८००००५२५७ | १. विशाल सदाब्रीज यादव<br>२. उर्मिला जगन्नाथ यादव | रु. १५२७४३४/- (रुपये पंधरा लाख सत्तावीस हजार चारशे चौतीस फक्त) (तारीख : २५.११.२०२१) | २४.०१.२०२२ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट नं.००१, तळमजला, ''बी'' फेज, बिल्डिंग नं.०५, स्वामी कॉम्प्लेक्स, राजलक्ष्मी गोडाऊन जवळ, पूर्णा, भिवंडी, ठाणे-४२१३०२. चार सीमा : उत्तर : बिल्डिंग नं. बी-३, दक्षिण : लॉबी एरिआ/फ्लॅट नं.६, पूर्व : फ्लॅट नं.०२, पश्चिम : फ्लॅट नं.बी-२

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएल०एचएल-०२२०००१३२८५ | १. निखिल शत्रुघ्न लोरे<br>२. राहूल शत्रुघ्न लोरे | रु. १७२६४६४/- (रुपये सतरा लाख सव्वीस हजार चारशे चौसष्ट फक्त) | २४.०१.२०२२ | प्रत्यक्ष ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** फ्लॅट नं.२०११, दुसरा मजला, बिल्डिंग ''जे'', जादूगर बिल्डिंग, कर्म नगरी, फेज-४, व्हिलेज पिंपरी, मुंब्रा-४००६१२. चार सीमा : उत्तर : फ्लॅट नं.२०१०, दक्षिण : फ्लॅट नं. २०१२, पूर्व : लॉबी एरिआ, पश्चिम : मंजील बिल्डिंग.

| लोन अकाऊंट नं. | ऋणको व सह ऋणकोचे नाव | मागणी सूचनेची रक्कम व तारीख | ताब्याची तारीख | ताब्याचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| एलएनकेएएलएलएपी-०११९००००८४४९,<br>एलएनकेएएलएलएपी-०११९००००८४५० | १. शादाब हमीद सय्येद<br>२. मिस्मिन हमीद सय्येद | रु. ८३१८६४/- (रुपये आठ लाख एकतीस हजार आठशे चौसष्ट फक्त) | २४.०१.२०२२ | सांकेतिक ताबा |

**मालमत्तेचे वर्णन :** रूम नं.२७३/आय-२, अब्दुल रेहमान मंजील, जुना आग्रा रोड, मुक्काम पोस्ट-वासिंद, ता. शहापूर, वासिंद, पिन- ४२१६०४. चार सीमा : उत्तर : अंडर कंन्स्ट्रक्शन बिल्डिंग, दक्षिण : फ्लॅट नं.२७४, पूर्व : रेसिडेंशियल बिल्डिंग व्ह्यू, पश्चिम : स्टेअरकेस एरिआ.

**स्थळ : मुंबई**
**तारीख : २८/०१/२०२२**

**स्वाक्षरी/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**इन्डोस्टार होम फायनान्स प्रा.लि.**